# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र   जिल्हा District: मुंबई   पोलीस ठाणे Police Station: भ्र.प्र.वि   पहिली खबर क्र. FIR No.: २८   वर्ष Year: २०२५   दिनांक Date: २३/०४/२५

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. १९८८   कलमे Sections: ७.
   (ii) अधिनियम Act: ........   कलमे Sections: ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day: मंगळवार   तारीख पासून Date from: ०१/०४/२५   वेळ Time: ११:५०   तारीख पर्यंत Date to: २३/०४/२५   वेळ Time: १६:२५

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.००  (2) ०३.०० ते ०६.००  (3) ०६.०० ते ०९.००  (4) ०९.०० ते १२.००  (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.००  (7) १८.०० ते २१.००  (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S.   तारीख Date ........   वेळ Time ........

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ........   तारीख Date: २३/०४/२५   वेळ Time: २३.५० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information: सापळा कारवाई   लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........   चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणचे नाव Address of Occurrence Name: म.न.पा   ठिकाणाचे नंबर No. if any: आर/दक्षिण   गल्ली Ward: विभाग,   रस्त्याचे नाव Name of road ........

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place: कांदिवली   गाव Village: मुंबई   पोस्ट Post ........   तालुका Taluka ........   जिल्हा Dist. ........   राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........   तालुका Taluka ........   जिल्हा Dist. ........   राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: रवि लखाणी   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: लक्ष्मणदास लखाणी

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ........   (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय   फोन नं. Phone No.: ९२५२९८२२९८

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........   दिल्याचा दिनांक Date of issue ........   दिल्याचे ठिकाण Place of Issue ........   (f) व्यवसाय Occupation: हॉटेल

(g) धर्म Religion ........   जात Caste ........   जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address: ई-९४, प्रसन्न बाइट, जनकल्याण नगर, मालाड (प), मुंबई-४०००६६   गल्ली/सर्व्हे नं. Ward ........   घर/नाव नं. House Name No. ........   फोन/मो. नं. Phone No. ........   पॅन नं. Pan No. ........   वोटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road ........   जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........   गाव Village ........   पोस्ट Post ........   पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........   जिल्हा Dist. ........   राज्य State ........   सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

लोसे १. शिवाजी कदम, धंदा नोकरी, स्वच्छता निरिक्षक, आर/दक्षिण, एमजीरोड कांदिवली (प), मुंबई इ.

(G.C.P.) K 1043 (A) (1000–1-2025)

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी यांचा जबाब स्वतंत्र कागदावर संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तोच प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(नितीन भोसले)
पोलीस निरीक्षक,
भा.प्र.वि., मुंबई

रति लक्ष्मी
23-7-2025

Scanned with OKEN Scanner

जबाब दिनांक २३/०७/२०२५

श्री रवी लक्ष्मणदास लखाणी, वय ३७ वर्षे, व्यवसाय– हॉटेल व्यवसाय, रा.ठि ई/८४, प्रसन्न वास्तु, जनकल्याण नगर, मालाड, वेस्ट, मुंबई ९५ मो.नं. ९२५२१४१२९८, मुळपत्ता बी–२९७, शास्त्री नगर, भिलवाडा, राजस्थान – आधारकार्ड नंबर २६५८९२९८५५३४

मी वरीलप्रमाणे असून वर नमूद पत्त्यावर मागील ०६ महिन्यापासुन माझी पत्नी रुही हिच्यासोबत राहत आहे. माझे 'द बिन बॉक्स कॅफे' नावाचे चारकोप, कांदिवली वेस्ट, मुंबई या ठिकाणी हॉटेल आहेत. माझे हॉटेल 'बॅक यार्ड स्नुकर' नावाच्या स्नुकर पार्लर मध्ये असुन या बॅकयार्ड स्नुकर आस्थापनेचे मालक श्री प्रतिक आहेत. मी श्री प्रतिक यांच्याकडुन त्यांच्या स्नुकर पार्लर मधील किचन मागील एक वर्षापासुन मासीक २८ हजार रूपये भाडेतत्वावर चालविण्यासाठी घेतले आहे. त्याबाबतचे कोणताही करारनामा मी केलेला नाही.

दि.२४/०६/२०२५ रोजी 'बिन बॉक्स कॅफे' चारकोप, कांदिवली वेस्ट, मुंबई या आस्थापनेच्या ठिकाणी दोन इसम आले व त्यांनी त्यांची ओळख म.न.पा. आर/दक्षिण विभागातील हेल्थ डिपार्टमेन्टचे अधिकारी असल्याचे सांगितले. त्यातील एका इसमाने त्यांचे नाव श्री कदम असे सांगितले. व दुस–या इसमाने त्यांचे नावे श्री आवारे असे सांगितले. त्यांनी माझे कडे हॉटेल आस्थापना चालविण्यासाठी आवश्यक असलेले फुड लायसन्स, उदयम आधार, गुमास्ता, बिल्डिग फायर सेफटी परवाने दाखविण्यास सांगितले त्यावर मी त्याना नमुद परवाने दाखविले. त्यानंतर त्यांनी मला हेल्थ लायसन्स आणी इटींग हाउस परमिशन दाखविण्यास सांगितले. तेव्हा मी माझेकडे सदर परवाने नसल्याचे सांगितले. तेव्हा त्यांनी आस्थापना बंद करण्यास सांगुन हॉटेल मधील गॅस बाटला, एक पिझ्झा ओवन, एक सॅन्डविच ग्रिलर, एक मायक्रोओवन, इंडक्शन व इतर सामान घेवुन गेले व मला म.न.पा. आर/दक्षिण विभाग, कार्यालयात बोलविले.

म्हणुन मी, माझी पत्नी रूहीसह दि.२७/०६/२०२५ रोजी म.न.पा. आर/दक्षिण कांदीवली, कार्यालयात गेलो. तेथे आवारे साहेबांना भेटलो त्यांनी मला माझे सामान सोडविण्यासाठी रु.११,०००/– दंड भरुन सामान घेवुन जाण्यास सांगितले. माझेकडे एवढी रक्कम नसल्याने मी परत घरी आलो.

त्यानंतर मी, माझी पत्नी रूहीसह दुस–या दिवशी दि.२८/०६/२०२५ रोजी पुन्हा म.न.पा. आर/दक्षिण विभाग, कांदिवली, कार्यालयात जावुन श्री कदम यांना भेटलो. तेव्हा श्री कदम यांना मी माझी आस्थापना पुढे चालु ठेवण्यासाठी मदत करा अशी विनंती केली. तेव्हा त्यांनी मला त्यांचे सिनीयर मॅडम श्रीमती पुजा देसाई यांना भेटण्यास सांगुन ते मला श्रीमती पुजा देसाई मॅडमच्या कार्यालयात घेवुन गेले. श्रीमती पुजा देसाई यांच्या कार्यालयीन कक्षाच्या बाहेर मला उभे करुन श्री कदम हे एकटेच श्रीमती पुजा देसाई मॅडम यांच्या कक्षात आत गेले. त्यानंतर ते बाहेर आले आणी मला श्रीमती पुजा देसाई मॅडमच्या कक्षामध्ये घेवुन गेले. तेथे देसाई मॅडमशी चर्चा करते वेळी त्या मला म्हणाल्या "देखते है"। असे म्हणुन मला बाहेर थांबण्यास सांगितले. तेव्हा मी बाहेर येवुन उभा राहीलो काही वेळाने कदम बाहेर आले व ते त्यांच्या कॅबिनमध्ये घेवुन गेले. तेव्हा ते मला म्हणाले, "आपको हॉटेल चालु रखना है तो अगले तीन महिने का ४० हजार रुपये देने होगे वरना मॅडम और मै आपको हॉटेल चलाने नही देंगे। मी हे कशाचे पैसे आहेत असे विचारले असता श्री कदम यांनी ते तुमची हॉटेल चालवू देण्यासाठी माझे आणी मॅडमचे असतात" असे मला सांगीतले. त्यावर मी त्यांना एवढी रक्कम देवु शकत नसल्याचे सांगितले. तेव्हा कदम मला पुन्हा देसाई मॅडमकडे घेवुन गेले तेव्हा मॅडमला मी एवढे पैसे देवु शकत नाही असे सांगीतले तेव्हा मॅडमने मला रागाने बाहेर जाण्यास सांगुन कदम यांना म्हणाल्या की, यांचे सामान परत देवु नका नाहीतर तो पुन्हा हॉटेल चालु करेल. तेव्हा मी मॅडमला रिक्वेस्ट केली त्यावर मॅडमनी मला सोमवारी येवुन भेटण्यास सांगितले. परंतु मी सोमवारी म.न.पा. कार्यालयास भेटण्यास गेलो नाही.

मला श्री कदम व श्रीमती पुजा देसाई मॅडम यांना रु.४०,०००/– रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक ०१/०७/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे माझी पत्नी रूहीसह हजर राहुन स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार केली. माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील पोलीस निरीक्षक नितीन थोरात व पो.नि. संतोष गुर्जर यांची नेमणुक करण्यात आली.

त्याच दिवशी दि.०१/०७/२०२५ रोजी मी दिलेले लेखी तक्रारीवर पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला पो.नि. थोरात यांनी सांगितले. त्यावरुन दोन पंचासमक्ष मी माझे मोबाईल क्र.



Scanned with OKEN Scanner

९२५२१४१२९८ वरुन लोकसेवक श्री कदम यांचा मो.न.९७६९९९७०७९ वर सिपकर ऑन करुन कॉल केला. तेव्हा कदम यांनी मला म्हणाले "आप आ जाव इधर ऑफिस मे आ जाव बात करता हु मै आपके साथ ".. तेव्हा मी म्हणालो "कितने बजेतक हो तो मै आता हु फिर... " तेव्हा लोकसेवक कदम म्हणाले "मै पाच बजेतक हु इधर" सदरचा कॉल पो.नि. थोरात यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत केला त्यानंतर आम्ही सायंकाळी पंच व पडताळणी पथकासह श्री कदम यांना भेटण्यास निघालो ट्रॅफिक जाम असल्याने आम्हास पोहचण्यास उशीर झाला. तेव्हा मी लोकसेवक यांचे मोबाईलवर कॉल केला तेव्हा ते घरी पोहचल्याचे सांगीतले. त्यामुळे लोकसेवक कदम यांनी भेट झाली नाही.

त्यानंतर दुस—या दिवशी दि.०२/०७/२०२५ रोजी पुन्हा कदम यांना पंचासमक्ष कॉल करुन भेटी बाबत विचारणा केली तेव्हा त्यांनी तीन साडे तीन पर्यन्त कार्यालयात बोलविले. त्यावर मी, पत्नी रूही व पंच असे दुपारी श्री कदम यांना कार्यालयात भेटलो तेथे आमची चर्चा झाली व श्री कदम यांनी मला देसाई मॅडमकडे घेवुन गेले. तेथे मॅडमनी माझे सामान सोडवुन घेवुन जाण्यास सांगितले. तेव्हा मी मॅडमला पुढे आस्थापना चालु करण्याबाबत विनंती केली तेव्हा त्यांनी मला तुमच्याकडे लायसन्स नसेल तर तुम्ही हॉटेल बंद करा असे सांगीतले. तेव्हा मी म्हणालो जो श्री मन्थ का जो बात हुआ था उसपे तेव्हा मॅडम म्हणाल्या, फरगेट अबाउट श्री मन्थ ये जो है उसके हिसाबसे ही जाना है ठिक है, त्यांनी मला बाहेर जाण्यास सांगितले. त्यानंतर मी श्री कदम यांच्याशी बोलणे केले त्यानंतर श्री आवारी यांना भेटुन माझे सामान सोडविण्यास गेलो असता श्री आवारी यांनी मला दुस—या दिवशी ११.०० वाजता येवुन भेटण्यास सांगितले.

त्यानंतर पुन्हा दि.०९/०७/२०२५ रोजी पुन्हा कदम यांना पंचासमक्ष मोबाईलवर कॉल करुन भेटीबाबत विचारणा केली तेव्हा त्यांनी मला चार वाजता भेटण्यास बोलविले चार वाजता पत्नी रूही व पंचासोबत श्री कदम यांची भेट घेतली असता, लोकसेवक कदम म्हणाले, **तिस हजार बोली** तेव्हा मी म्हणालो, तिस हजार सर जादा हो जाएगा पच्चीस कर दिजिए सर इसको, तेव्हा लोकसेवक कदम म्हणाले, अभी जाउ देखते है, तेव्हा मी म्हणालो, और वो अमाउंट का कैसे करना है बता दिजिएना मेरे को, तेव्हा लोकसेवक कदम म्हणाले, आ जाउ ना कल परसौ मे, तेव्हा मी म्हणालो, कल परसौ आ जाउ ठिक है ठिक है मै फोन करके आता हु थॅक्यु सो मच सर थॅक्यु".. असे संभाषण लोकसेवक श्री कदम यांनी माझेकडे रु.३०,०००/— हे उदया किवा परवा कार्यालयात घेवुन येण्यास सांगितले. सदर संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आलेले आहे.

दि.११/०७/२०२५ रोजी मी, पत्नी रूहीसह ला.प्र.वि. वरळी, मुंबई येथे पो.नि. थोरात व पो.नि. गुर्जर यांचे समक्ष हजर झालो. त्यांनी माझेकडे चौकशी करुन सापळा कारवाई करण्याचे ठरले. त्यावरुन मी ॲन्टीकरप्शनचे अधिकारी व अंमलदार असे रघुलिला मॉल, कांदीवली या ठिकाणी आलो. तेव्हा मी पंचासमक्ष लोकसेवक श्री कदम यांना माझे मोबाईल वरुन कॉल केला. यावेळेचे संभाषण पो.नि. थोरात यांनी व्हाईस रेकॉर्डरवर रेकॉर्ड करून घेतले. तेव्हा लोकसेवक कदम यांनी साडेतीन वाजेपर्यन्त येवुन भेटण्यास सांगितले. त्यावरुन मी पंचासमक्ष माझे बचतीमधीले रु.१५,०००/— (रु.५००/— दराच्या भारतीय चलनी ३० नोटा) रक्कम पो.नि. थोरात यांचेकडे लाच रक्कम म्हणुन वापरण्यास दिली. उर्वरीत १५,०००/— रक्कम ही खेळण्यातील डमी नोटा म्हणुन वापरण्यात येणार असल्याचे सांगितले. पो.नि. थोरात यांनी सदर भारतीय चलनाचे नोटाचे फोटो त्यांचे मोबाईलमध्ये पी.डी.एफ. करुन घेतले. त्यांनतर वाहनाचे चालक पोउनिचा जामसंडेकर यांना वाहनामध्ये बोलाविले. पोउनिचा जामसंडेकर हे सोबत पेटी घेवुन आले. पोउनिचा जामसंडेकर यांनी पेटीतील ॲन्थ्रोसिन पावडर व अल्ट्राव्हायलेटची लाईट दाखवली. पावडरचे गुणधर्म मला व पंचास सांगुन नंतर त्यांची प्रात्यक्षिक वाहनामध्ये करुन दाखवली. त्यानंतर पो.नि. गुर्जर व पो.नि. थोरात यांचे सुचनेवरुन पोउनिचा जामसंडेकर यांनी रु. ३०,०००/— (रु.५००/— दराच्या भारतीय चलनी ३० नोटांना व खेळण्यातील ५०० दराच्या ३० डमी नोटांना) दोन्ही बाजुस कापसाच्या बोळयाने ॲथ्रोसिन पावडर लावुन चार्जर अट्राव्हायलेटच्या दिव्यामध्ये प्रात्यक्षिक करुन दाखवली. त्यानंतर सदरच्या नोटा एका खाकी रंगाच्या पाकीटामध्ये ठेवल्या. त्या खाकी रंगाच्या पाकीटावर देखील ॲन्थ्रोसिन पावडर दोन्ही बाजुने लावली. त्यानंतर सदर खाकी रंगाचे पाकीट माझे पॅन्टच्या उजव्या खिश्यामध्ये अलगद ठेवले. त्यानंतर पोउनिचा जामसंडेकर यांना वाहनाच्या बाहेर गेले. त्यानंतर सदर लाचेची रक्कम श्री कदम यांनी स्विकारल्यानंतर सापळा पथक व्हॉटसअॅप ग्रुपवर थम इमोजी ने इशारा करावा अशी सुचना पो.नि.



Scanned with OKEN Scanner

थोरात, पो.नि. गुर्जर यांनी दिली.त्याठिकाणी पो.नि. थोरात, पो.नि. गुर्जर, दोन पंच व एसीबी कडील स्टाफ हजर होता.

पो.नि. थोरात, पो.नि. गुर्जर यांनी मला, पंचांना व स्टाफला सापळाबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. थोरात यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टाच्या आतील बाजुस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर कोणासही दिसणार नाही अश्या पध्दतीने लावला. त्यानंतर मी, पत्नी रूही व पंच श्री.पवार यांचे सोबत म.न.पा. आर/दक्षिण कार्यालयाच्या दिशेने ऑटो रिक्षाने रवाना झालो. माझे मागोमाग उर्वरीत सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार, पंच ेख आले. त्यानंतर मी, माझी पत्नी व पंच पवार म.न.पा. कार्यालाचे मुख्य प्रवेशव्दारातुन आत जात असतेवेळी गेट जवळ लोकसेवक पवार यांची भेट झाली तेव्हा लोकसेवक कदम मला म्हणाले, **"नई नई वो ठिक है उसकी आप कोई घाई मत करो आप आनेके बाद हमलोग आऐंगें उसका टेन्शन लो मत बस हम और कुछ रहेगा तो फोन चालु है ही.. ऐसा कुछ हमलोग देंगे ग्रीन सिग्नल तभी ये करने का ठिक हम चला"** असे संभाषण झाल्यानंतर लोकसेवक कदम हे मला बोलवतील तेव्हा भेटण्यास सांगितले. त्यानंतर मी व माझी पत्नी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दारातुन बाहेर आलो व ऑटो रिक्षा थांबवली. त्यावेळी पंच श्री पवार आमचे ऑटो रिक्षात बसले त्यानंतर आम्ही परत रघुलीला मॉल येथे सरकारी वाहने थांबवली तेथे परत आलो व सदरची घटना पो.नि. थोरात व पो.नि. गुर्जर यांना सांगितली.

त्यानंतर मी आज दिनांक २३/०७/२०२५ रोजी माझे घरी हजर असतांना माझे मोबाईल नंबर ९२५२१४१२९८ वरुन लोकसेवक श्री कदम यांचा मो.न.९७६९९९७०७९ वर कॉल करून विचारणा केली असता त्यांनी मला आज दुपारी ०४.०० वाजता त्यांचे कार्यालयास भेटण्यास बोलावले. तशी माहिती मी पो नि श्री थोरात यांना फोनकरून दिली. त्याप्रमाणे पो.नि. श्री थोरात यांनी मला आज दुपारी ०४.०० वाजता लोकसेवक श्री कदम यांचेवर लाचेची सापळा कारवाई आयोजीत करण्यात येईल असे सांगीतले व त्याकरीता मला तात्काळ ला.प्र.वि. वरळी, मुंबई येथे हजर होण्याबाबत कळविले.

मी, माझी पत्नी रूहीसह आज दिनांक २३/०७/२०२५ रोजी दुपारी ०१.१५ वाजताचे सुमारास ला.प्र. वि.वरळी, मुंबई येथे पो.नि श्री थोरात व पो नि श्री गुर्जर यांचे समोर हजर झालो. त्यांनी माझेकडे चौकशी करुन सापळा कारवाई करण्याचे ठरले. त्यावरुन मी ॲन्टीकरप्शनचे अधिकारी व अंमलदार असे रघुलीला मॉल, कांदीवली या ठिकाणी आलो. तेथे पोनि थोरात यांनी त्यांचे स्वत:चे, माझे व पंचांचे आवाजामध्ये वक्तव्य रेकॉर्ड केले. लोकसेवक श्री कदम यांनी मला दुपारी ०४.०० वाजता भेटण्यास बोलावले असल्याने मी पोनि थोरात यांना पंचासमक्ष माझे बचतीमधील रु. १५,०००/— (रु.५००/— दराच्या भारतीय चलनी ३० नोटा) रक्कम पो. नि. थोरात यांचेकडे लाच रक्कम म्हणुन वापरण्यास दिली. उर्वरीत १५,०००/— रक्कम ही खेळण्यातील डमी नोटा म्हणुन वापरण्यात येणार असल्याचे पोनि थोरात यांनी सांगितले. पो.नि. थोरात यांनी सदर भारतीय चलनाचे नोटांचे फोटो त्यांचे मोबाईलमध्ये पी.डी.एफ. करुन घेतले. त्यांनतर वाहनाचे चालक पोशि कदम यांना वाहनामध्ये बोलाविले. चालक पोशि कदम हे सोबत पेटी घेवुन आले. चालक पो शि कदम यांनी पेटीतील ॲन्थ्रोसिन पावडर व अल्ट्राव्हायलेटची लाईट दाखवली. पावडरचे गुणधर्म मला व पंचास सांगुन नंतर त्यांची प्रात्यक्षिक वाहनामध्ये करुन दाखवले. त्यानंतर पो.नि. गुर्जर व पो.नि. थोरात यांचे सुचनेवरुन चालक पोशि कदम यांनी रु. ३०,०००/— (रु.५००/— दराच्या भारतीय चलनी ३० नोटांना व खेळण्यातील ५०० दराच्या ३० डमी नोटांना) दोन्ही बाजुस कापसाच्या बोळयाने ॲथ्रासिन पावडर लावुन चार्जर अट्राव्हायलेटच्या दिव्यामध्ये प्रात्यक्षिक करुन दाखवली. त्यानंतर सदरच्या नोटा एका खाकी रंगाच्या पाकीटामध्ये ठेवल्या. त्या खाकी रंगाच्या पाकीटावर देखील ॲन्थ्रोसिन पावडर दोन्ही बाजुने लावली. त्यानंतर सदर खाकी रंगाचे पाकीट माझे पॅन्टच्या उजव्या खिश्यामध्ये अलगद ठेवले. त्यानंतर चालक पो शि कदम हे वाहनाच्या बाहेर गेले. त्यानंतर सदर लाचेची रक्कम श्री कदम यांनी स्विकारल्यानंतर सापळा पथक व्हॉटसअॅप ग्रुपवर थम इमोजी ने इशारा करावा अशी सुचना पो.नि. थोरात, पो.नि. गुर्जर यांनी दिली. त्यावेळी पो.नि. थोरात, पो.नि. गुर्जर, दोन पंच, रूही व एसीबी कडील स्टाफ हजर होता.

पो.नि. थोरात, पो.नि. गुर्जर यांनी मला, पंचांना व स्टाफला सापळया बाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो. नि. थोरात यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टाच्या आतील बाजुस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर कोणासही दिसणार नाही अश्या पध्दतीने लावला. त्यानंतर मी, माझी पत्नी रूही व पंच श्री.पवार यांचे सोबत म.



Scanned with OKEN Scanner

न.पा. आर/दक्षिण कार्यालयाच्या दिशेने ऑटो रिक्षाने रवाना झालो. माझे मागोमाग उर्वरीत सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार, पंच शेख आले. मी, माझी पत्नी व पंच पवार म.न.पा. कार्यालाचे मुख्य प्रवेशव्दारातुन आत प्रवेश करून लिफट ने ३ रा माळयावर गेलो. त्याठिकाणी लॉबीमध्ये माझी पत्नी लोकसेवक यांचे रूम बाहेर थांबुन राहीली. तर मी लोकसेवक श्री कदम यांचे कॅबीनमध्ये गेलो त्यावेळी रुम मध्ये एक इसम बसले होते. श्री कदम यांना संशय येवु नये म्हणुन मी पंच श्री पवार याना **''आप बहार बैठो.''** असे म्हणुन मी आत कॅबिनमध्ये गेलो. श्री कदम यांचे समोर एक इसम बसला होता. मी त्यांच्या बाजुला जावुन बसलो. तेव्हा तो इसम उठुन बाहेर गेला. त्यावेळी मी श्री कदम यांचेशी चर्चा करीत असतेवेळी मी त्याना म्हणालो **वो मे लाया हु दे दू आपको।** त्यावेळी कदम म्हणाले **इधर रख दो..** मी हा म्हणालो,,, त्यावेळी कदम म्हणाले **हा पाकीट मे है ना।...** तेव्हा मी हा पाकीटमे है रखदु इधर तेव्हा कदम म्हणाले, **पिछे रख दु...** त्यावेळी मी म्हणालो **लॅपटॉप के पिछे** असे म्हणुन मी लाच रक्कमेचे खाकी रंगाचे पाकीट लॅपटॉपच्या पाठीमागे ठेवले... त्यावेळी कदम मला म्हणाले **चाय वैगेरे कुछ पिओगे..** अशी करतेवेळी मी बसलेल्या ठिकाणी माझा मोबाईल मध्ये व्हॉटसअॅप ग्रुपवर सापळा पथकास कदम यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत थम इमोजी चा इशारा केला. त्यावर काही वेळातच सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी लोकसेवक श्री कदम यांना ताब्यात घेतले. लोकसेवक श्री कदम यांनी लाचेच्या रकमेचा स्विकार केल्याबाबतचा पुर्वनियोजित ईशारा म्हणुन मी सापळा पथक व्हॉटसअॅप ग्रुपवर थम इमोजी टाकला. सदरचा इशारा होताच सापळा पथकाने पचांसह तेथे प्रवेश करून लोकसेवक श्री कदम यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले. त्यानंतर सापळा पथकातील अधिका–यांनी सापळयाची तेथील कारवाई पुर्ण केल्यानंतर लोकसेवक श्री कदम यांचेसह आम्ही सर्व एसीबी कार्यालय, वरळी, मुंबई येथे आलो.

माझा श्री. कदम यांचेशी कोणताही वैयक्तिक आर्थीक देवाण–घेवाणीचा व्यवहार किंवा त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही. लोकसेवक श्री गणेश कदम, स्वच्छता निरीक्षक, वय ५४ वर्षे, धंदा– नोकरी, (मनपा आर/दक्षिण वार्ड, कांदिवली (पुर्व) मुंबई) यांनी त्यांच्या पदाचा बेकायदेशीरपणे वापर करून, स्वतःच्या आर्थिक फायदयाकरीता माझी आस्थापना चालु ठेवण्याकरीता पुढील तीन महिन्याचे मिळुन ४० हजार रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू ३०,०००/–ठरवून दि. २३/०७/२०२५ रोजी माझेकडून रू.३०,०००/– लाच स्विकारतांना त्यांना लाप्रवि, वरळी, मुंबई येथील पथकाने जागीच ताब्यात घेतले आहे. म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील जबाब माझे सांगणे प्रमाणे मराठीत टंकलिखीत करून मला हिंदीतुन समजावुन सांगीतला असुन तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(नितीन थोरात)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

रवि लक्ष्मी
23-7-2025



Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page. नमुद ता., वेळीस ठिकाणी यातील तक्रारदार यांचे द. [illegible] हॉटेल [illegible] दि. 24/06/25 रोजी मनपा, आरोग्य विभागातील स्वच्छता अधिकारी, [illegible] यांनी कारवाई करून तक्रारदार यांचेकडे हेल्थ लायसन्स नसल्याने सामान जप्त करून हॉटेल बंद करण्यास सांगितले नंतर तक्रारदार यांना हॉटेल चालू ठेवायचे असेल तर पुढील तीन महिन्यांसाठी रु. 40,000/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रु. 30,000/- स्विकारण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे दि. 23/07/25 रोजी यातील आलोसे यांना तक्रारदार यांचेकडून रु. 30,000/- लाच रक्कम स्विकारताना रंगेहात ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करून तपासावर घेतला

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पोलीस निरीक्षक नितीन थोरात

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........

(3) Transferred to P. S. ........

District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant/Informant [illegible]

23-7-2025

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ........ नितीन थोरात

पदनाम Rank ........ पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. ........

Posting

Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........

1. Date and time of submitted to the Court.

| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
|---|---|---|---|---|
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner